<u>प्रेस नोट</u>
<u>अग्निशमन दल</u>
<u>पुणे महानगरपालिका</u>

दिनांक :- २९/०९/२०२६

<u>पुणे शहराच्या अग्निसुरक्षततेसाठी मा. महापालिका आयुक्तांचे नियमित तपासणी व नियमांची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश :- आज बँक ऑफ इंडिया यांचे कार्यालय, लक्ष्मी रोड, पुणे या वर्दळीच्या ठिकाणी आगीची घटना</u>

शहरातील अग्निसुरक्षेच्या दृष्टीने मा. महापालिका आयुक्त श्री. नवल किशोर राम यांनी विविध आस्थापनांच्या तपासणीचे मुख्य अग्निशमन अधिकारी यांना आदेश दिले होते. तसेच सर्व आस्थापनांनी आवश्यक असणारे अग्निसुरक्षा विषयक ऑडीट करून घेणे बंधनकारक असल्याने अग्निशामक दलाकडून अग्निसुरक्षतेचे ऑडीट तात्काळ पूर्ण करून घेण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. जे अग्निसुरक्षा विषयक नियमांची पुर्तता करणार नाहीत अश्या आस्थापनांवर कडक कारवाई करण्याचे आदेश मा. महापालिका आयुक्त यांनी दिले आहेत. त्यानुसार गेल्या आठवडाभरात ४१४ जसे कि हॉटेल, पेइंग गेस्ट, क्लासेस, हॉस्पिटल अश्या विविध आस्थापनांची तपासणी करीत नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांवर कडक कारवाई करून त्यांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

आज दिनांक २९/०९/२०२६ रोजी सकाळी ठिक १०.११ वाजता अग्निशमन दल नियंत्रण कक्षात लक्ष्मी रस्ता, शगुन चौक, बँक ऑफ इंडियाच्या इमारतीत आग लागल्याची वर्दी मिळताच दलाकडून मध्यवर्ती, कसबा, एरंडवणा, नायडू, कोंढवा अग्निशमन केंद्र येथून ४ फायरगाड्या व ३ वॉटर टँकर अशी एकुण ७ वाहने घटनास्थळी रवाना करण्यात आली होती.

घटनास्थळी जवान पोहोचताच जवानांना आगीचे स्वरूप निदर्शनास येताच जवानांनी वर्दळीचा परिसर व लगतच असणाऱ्या इमारती यांचे गांभीर्य ओळखून आग इतरत्र पसरू न देता तातडीने होज पाईप, बीए सेट, रश्शी, एक्स्झॉट ब्लोअर अशा अत्याधुनिक साहित्याचा वापर करीत आगीवर नियंत्रण मिळवत पुढील धोका टाळला. या आगीवर नियंत्रण मिळवण्यात जवळपास एक तास अवधी लागला असून या मध्ये जवानांनी वेळेत केलेल्या कामगिरीमुळे सुदैवाने कोणीही जखमी अथवा कोणत्याही प्रकारची जिवितहानी झालेली नाही.

घटनास्थळी काम करणारे सुरक्षा रक्षक यांच्या म्हणण्यानुसार, सहाव्या मजल्यावरील कार्यालयातील एका एसीने पेट घेतला असता या सुरक्षा रक्षकाने फायर एक्स्टिंग्युशरच्या सहाय्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला. आग आटोक्यात येत नाही हे समजताच अग्निशमन दलास पाचारण करण्यात आल्याची माहिती प्रत्यक्षदर्शीने दिली.

सदर घटनास्थळी लोअर ग्राऊड + तळमजला + ६ मजली अशा आरसीसी बांधकाम असलेल्या इमारतीच्या सहाव्या मजल्यावर अंदाजे ८०×८० फुट हॉल मध्ये प्लायवुडच्या सहाय्याने पार्टिशनमध्ये ४ ऑफिस तयार करण्यात आले होते. त्यामध्ये बॅटरी बॅकअप रुमदेखील होते, यापैकी सदरील ३ ऑफिस मधील कॉम्प्युटर, टेबल, खुर्ची, एसी, इलेक्ट्रिक वायरिंग, बॅटरी, प्रिंटर, झेरॉक्स मशिन व इतर सर्व साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

सदर कामगिरीत मुख्य अग्निशमन अधिकारी गणेश सोनुने यांच्या नेतृत्वाखाली अग्निशमन अधिकारी पंकज जगताप, कमलेश चौधरी, निलेश महाजन तसेच जवान आझीम शेख, दिलीप घडशी, चंद्रकांत आनंदास, संतोष अरगडे, कैलास पवार, विशाल गायकवाड, चंद्रकांत नवले, सुरेश पवार या सह जवळपास तीस जवानांनी सहभाग घेतला.

सदर घटनास्थळी कोणतीही स्थायी अग्निशमन यंत्रणा आढळून आली नाही. तसेच सदर घटनास्थळी फायर एक्स्टींग्युशर्स, फायर अलार्म सिस्टीम, डिटेक्शन सिस्टीम अस्तित्वात होती असे निदर्शनास आले. सदर घटनास्थळी महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभाग, बांधकाम विभाग, पोलिस दल, महावितरण विभाग हे उपस्थित होते.

"बँक ऑफ इंडीयामधील आगीची घटना मोठी होती. अधिकारी व जवानांनी अत्याधुनिक यंत्रणा वापरत शहरातील लक्ष्मी रोडसारख्या गजबजलेल्या परिसरात शर्थीचे प्रयत्न करीत आग इतरत्र पसरु न देता आटोक्यात आणल्याने पुढील अनर्थ टळला." - गणेश सोनुने, मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन दल, पुणे मनपा.